जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/ ३९४४ /२०२२

वाहतूक नियंत्रण अधिसुचना

दिनांक -२९/०९/२०२२

बावधन वाहतुक विभागा अंतर्गत मुंबई बंगलुर राष्ट्रीय महामार्गावरील चांदणी चौकातील जुना पुल पाडण्याचे नियोजित करण्यात आलेले आहे. सदरचा पुल हा स्फोटकांद्वारे पाडण्यात येणार असल्याने सदरचे काम करतेवेळी व तेथील राडारोडा उचलण्याची कार्यवाही होईपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना तेथुन प्रवास करण्यास मनाई करणे आवश्यक आहे. सदरचे काम दि.१/१०/२०२२ रोजी २३.०० ते दि.२/१०/२०२२ रोजी ०८.०० वा दरम्यान नियोजित आहे. त्यामुळे सदर मार्गावरील सर्व प्रकारच्या वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी आनंद भोईटे, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

बावधन/ हिंजवडी / देहुरोड / वाकड वाहतूक विभाग

१.मुंबई -बेंगलुर राष्ट्रीय महामार्गावरील मुंबईकडुन येणारी जड वाहतूक ही उर्से टोल नाका पासुन चांदणी चौकाकडे जाण्यास बंदी करण्यात येत आहे.

२. मुंबई बेंगलुर राष्ट्रीय महामार्गावर सुसखिंड येथुन चांदणी चौकाकडे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

३.मुंबई कडुन पुणे साताराकडे जाणा-या हलक्या व प्रवाशी चारचाकी वाहनांकरीता

पर्यायी मार्ग –

१.मुंबई कडुन येणरी सर्व प्रकारची वाहने उर्से टोलनाका येथुन सेंट्रल चौक मार्गे जुन्या मुंबई पुणे हायवे मार्गे भक्ती शक्ती चौक, नाशिक फाटा , पुणे मार्गे इच्छित स्थळी जातील

२.वाकड चौक डावीकडे वळुन राजीव गांधी पुलावरुन विद्यापीठ मार्गे इच्छित स्थळी जातील.

३.भुमकर चौकातुन डावीकडे वळुन डांगे चौक मार्गे रक्षक चौक,राजीव गांधी पुलावरुन, औंध, शिवाजीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

४. किवळे चौकातुन रावेत,डांगे चौक मार्गे रक्षक चौक,रार्जीव गांधी पुलावरुन औंध, शिवाजीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

५.राधा चौक डावीकडे वळुन बाणेर रोडने पुणे विद्यापीठ चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

दि.१/१०/२०२२ रोजी २३.०० ते दि.२/१०/२०२२ रोजी ०८.०० वा पर्यंत (अथवा आवश्यकतेनुसार पुल पाडण्याचे काम पुर्ण होई पर्यंत) वाहतूकीत बदल करण्यात येत आहे.

(आनंद भोईटे)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी, बावधन,हिंजवडी, देहुरोड, वाकड वाहतुक विभाग

Scanned with CamScanner